**नियमित दिवाणी दावा क्रमांक ८४/२०१८ मधील**
**नि.क्र.३१ खालील आदेश**
**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय.०६—०००५२८—२०१८**

१. वादीने या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र. ९ यांनी दाखल केलेल्या प्रतिदाव्यावर त्यांचेविरुध्द झालेला “विना लेखी कैफियत आदेश” रद्द होवून मिळणेची मागणी केलेली आहे. त्यांचे असे कथन आहे की, ते ८५ वर्षाचे वयोवृध्द व्यक्ती असून मुदतीत आवश्यक ती माहिती घेवून वकिलांना भेटून लेखी कैफियत सादर करु शकले नाहीत. त्यामध्ये त्यांचा निष्काळजीपणा नव्हता. सबब त्यांचेविरुध्द झालेला “विना लेखी कैफियत आदेश” रद्द होवून कैफियत दाखल करणेस परवानगी मागितली आहे.

२. प्रतिवादींतर्फे या अर्जास हरकत घेवून अर्ज मंजूर करणेचा झालेस जास्तीत जास्त खर्च मिळणेची वैकल्पिकरित्या मागणी केलेली आहे.

३. उभय पक्षकारांतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रतिवादी क्र. ७, ८ व ९ तर्फे याकामी नि. २१ वर दिनांक १४/११/२०१८ रोजी प्रतिदावा दाखल करणेत आलेला आहे. त्यानंतर वादीतर्फे लेखी कैफियत दाखल करणेत आलेली नाही. दरम्यान वादीविरुध्द या प्रतिदाव्यावर आजतागायत “विना लेखी कैफियत आदेश” पारीत झालेला नाही ही या अर्जाचे कामी असलेली तांत्रिक बाब आहे. या अर्जाद्वारे वादी लेखी कैफियत दाखल करणेची परवानगी मागत आहे. वादीविरुध्द “विना लेखी कैफियत आदेश” पारीत झाला नसल्यामुळे हा आदेश रद्द करणेचा प्रश्न निर्माण होत नाही. वादीचे वय ८५ वर्षे आहे. ही बाब प्रतिवादींनी नाकारलेली नाही. सदय परिस्थितीमध्ये उभय पक्षकारांमधील वादाचे स्वरुप व वादीचे वयोमान पाहता वादीला लेखी कैफियत दाखल करणेस परवानगी दिल्यास दाव्याचा निर्णय गुणदोषावर होणेस मदत होणार आहे. सबब अर्ज मंजूर करणेस पात्र असल्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**—: :— <u>आदेश</u> —: :—**

१. वादीचा नि. ३१ वरील अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादीला प्रतिवादी क्र. ७, ८ व ९ यांचे प्रतिदाव्यास लेखी कैफियत दाखल करणेस परवानगी देणेत येते.

Digitally signed by Rupali Rajanikant Bedagkar
Date: 2020.02.17 18:29:32 +0530

दिनांक: १४.०२.२०२०

(श्रीमती. आर.आर.बेडगकर)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.